# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक २७ रविवार दि.२७ जूलै २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## राज्यात आज एसटी वाहतूक विस्कळीत ? गोपीचंद पडळकर यांच्याशी काय संबंध ?



नाशिक – भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर हे अध्यक्ष असणाऱ्या सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाच्यावतीने रविवारी नाशिकमध्ये राज्यस्तरीय कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात राज्यभरातून आठ ते १० हजार एसटी कर्मचारी सहभागी होण्याचा अंदाज आहे. यासाठी एसटी कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सुट्टी घेतल्याने रविवारी संपूर्ण राज्यातील एसटी वाहतूक विस्कळीत होण्याची चिन्हे आहेत. परंतु, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तसे काही होण्याची शक्यता नसल्याचा दावा केला आहे.

सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाचा तिसरा वर्धापन दिन नाशिकमध्ये साजरा होणार आहे. यानिमित्त रविवारी दुपारी १२ वाजता राज्यस्तरीय कामगार मेळावा व अधिवेशन येथील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृहात होत आहे. मेळाव्याच्या उद्घाटनासाठी जलसंपदामंत्री गिरीश महाजन, उद्योगमंत्री उदय सामंत, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांना निमंत्रित करण्यात आले आहे. अधिवेशन संघटनेचे प्रमुख गोपीचंद पडळकर आणि कार्याध्यक्ष सदाभाऊ खोत यांच्या अध्यक्षतेखाली होईल. तीन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या संघटनेने अल्पावधीत संपूर्ण राज्यात विस्तार केला. सध्या संघाचे ४० ते ४५ हजार एसटी कर्मचारी सभासद असल्याचे पदाधिकारी सांगतात. मेळाव्यातून जोरदार शक्ती प्रदर्शनाची तयारी संघटनेच्या धुरिणांनी केली आहे.

विशेष म्हणजे, या अधिवेशनात कर्मचाऱ्यांना सहभागी होणे सुलभ व्हावे म्हणून राज्य परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक मोहनदास भरसट यांनी संबंधितांना शिल्लक रजेतून रजा मंजूर करण्याचे आदेश दिले आहेत. अर्थात. दैनंदिन एसटी वाहतुकीवर परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यासही त्यांनी बजावले आहे.

सेवा सुरळीत राखण्याचे आव्हान

नागपूरसह इतर दूर अंतराहून मेळाव्यात सहभागी होणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांनी दोन दिवस तर, नाशिक आणि लगतच्या जिल्ह्यांतील कर्मचाऱ्यांनी एक दिवसाच्या सुट्टीसाठी अर्ज सादर केले आहेत. रजेचे हजारो अर्ज आल्यामुळे एसटी वाहतूक सुरळीत कशी ठेवायची, असे आव्हान विभाग नियंत्रक कार्यालयांसमोर उभे ठाकले आहे. नाशिकमध्ये अनेकांनी सुट्टी मागितल्याने तीन ते चार आगारांची सेवा ठप्प होऊ शकते. अशीच परिस्थिती राज्यात इतरत्र उद्भवू शकते. रविवारी एसटी वाहतूक सुरळीत राखण्यासाठी नियोजन केले जात असल्याचे अधिकारी सांगतात.

वाहतुकीवर परिणाम होणार नसल्याचा दावा

मेळाव्यास किमान सात ते आठ हजार एसटी कर्मचारी सहभागी होतील. त्यादृष्टीने भोजन व तत्सम व्यवस्था करण्यात आली आहे. साडेतीन हजार क्षमतेचे सभागृह अपुरे पडणार असल्याने बाहेरील बाजुला दोन पडद्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी होणार असले तरी राज्यातील एसटी वाहतुकीवर कुठलाही परिणाम होणार नाही. कारण, एसटी महामंडळात सुमारे ९० हजार कर्मचारी आहेत, असे सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाचे विभागीय सचिव बाळकृष्ण आव्हाड यांनी सांगितले. एसटीवर शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे आम्ही मेळाव्यासाठी रविवार हा शालेय सुट्टीचा दिवस निवडला. स्थापनेनंतर संघटनेने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर प्रभावीपणे पाठपुरावा केला. आज संघटनेचे ४० हजारहून अधिक सभासद आहेत. या अधिवेशनात त्यांच्याशी संबंधित प्रश्नांवर मंथन होईल, असे आव्हाड यांनी नमूद केले.

## आमरण उपोषणाला ५ दिवस झाले तरी उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना उपोषणकर्त्यांची भेट घेण्यास वेळ नाही-अमर गायकवाड

केज/प्रतिनिधी सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उप अभियंता युवराज मळेकर हे आमच्या मरणाची वाट पाहता काय? असा संतप्त सवाल उपोषणकर्त्यांनी माध्यमांशी बोलताना उपस्थित केला आहे. आमच्या आमरण उपोषणाला ५ दिवस पूर्ण झाले आहेत तरी सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना उपोषणकर्त्यांची भेट घेण्यास वेळ नाही का? अशी संतप्त प्रतिक्रिया उपोषण करर्ते अमर गायकवाड यांनी दिली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील सुकळी ते गोटेगाव दरम्यान बेकायदेशीर रस्त्याचे अधिग्रहण न करताच रुंदीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग केज हे करत आहेत. शेतकऱ्यांना पूर्वकल्पना न देता व शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रह न करताच त्यांना मावेजा न देता सार्वजनिक बांधकाम विभाग हे मनमानी कारभार करत आहेत. म्हणून २३ जुलै २०२५ रोजी पासून अमर गायकवाड, शाहू गायकवाड, अजित रांजणकर हे तीन शेतकरी आमरण उपोषण करत आहेत. परंतु सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज,या विभागाचे उपअभियंता युवराज मळेकर व कनिष्ठ अभियंता सचिन कांबळे यांनी त्यांच्या कार्यालयाच्या परिसरात शेतकऱ्यांचे गेले पाच दिवसांपासून आमरण उपोषण चालू असताना पाच दिवसांमध्ये एकदाही शेतकऱ्यांची उपोषण स्थळी जाऊन भेट घेतली नाही अथवा त्यांचे म्हणणे ऐकून घेतले नाहीत. फक्त कार्यालयीन कर्मचारी हे उपोषण स्थळी पाठवत आहेत. कार्यालयीन कर्मचारी हे उपोषण स्थळी शेतकऱ्या समवेत चर्चा करण्यासाठी येतात परंतु शेतकऱ्यांच्या मागण्या संबंधी त्यांना कसल्याच प्रकारची माहिती नसल्यामुळे ते शेतकऱ्याचे तथा उपोषणकर्त्यांचे प्रश्न सोडू शकत नाहीत. उप अभियंता युवराज मळेकर व कनिष्ठ अभियंता सचिन कांबळे हे वेळ मारून नेण्याचे काम करत आहेत का? उपअभियंता युवराज मळेकर व कनिष्ठ अभियंता सचिन कांबळे हे आमच्या मरणाची वाट पाहत आहे काय? असा संतप्त सवाल माध्यमांशी बोलताना उपोषणकर्त्यांनी उपस्थित केला आहे. दिनांक २४ जुलै २०२५ रोजी तहसीलदार केज यांना उपोषणकर्त्यांनी त्यांच्या उपोषणाची दखल घेण्यासंबंधी लेखी निवेदन दिले होते. त्या नियोजनाच्या अनुषंगाने तहसीलदार राकेश गड्डे यांच्या आदेशानुसार नायब तहसीलदार अशोक भंडारे व पेशकर नन्नवरे यांनी शुक्रवार रोजी दुपारी उपोषण स्थळी भेट देऊन शेतकऱ्या सोबत चर्चा करून त्यांच्या अडचणी व प्रश्न जाणून घेऊन सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपअभियंता युवराज मळेकर यांच्या समवेत मोबाईल दूरध्वनी वरून चर्चा करून सदर शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी तोडगा काढून तात्काळ उपोषण सोडण्यासंबंधी सूचना दिल्या. सदर चर्चे नंतर असे ठरविण्यात आले की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे व महसूल प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी मिळून सदर ठिकाणी जाऊन पंचनामा करण्याचे ठरवले असता. महसूल प्रशासनाचे मंडळ अधिकारी श्री. हजारे व तलाठी श्री.खतिब हे उपोषण स्थळी हजर होऊन बांधकाम उपविभागाचे कनिष्ठ अभियंता यांना वारंवार त्यांच्या मोबाईल दूरध्वनीवर संपर्क साधून पंचनामा करण्यासाठी जायचे आहे तुम्ही या असे म्हणून शुक्रवारी सहा वाजेपर्यंत विनंती करत होते. परंतु कनिष्ठ अभियंता कांबळे यांनी वेळोवेळी संबंधित महसूल प्रशासनाच्या अधिकारी कर्मचारी यांना विविध कारणे देऊन वेळ मारून नेण्याचे काम केले व कांबळे हे पंचनामा करण्यासाठी आले नाहीत असे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना उपोषणकर्त्यांनी सांगितले आहे. पुढे बोलताना अमर गायकवाड म्हणाले की, आम्हाला महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन चांगल्या प्रकारे सहकार्य करत आहेत. आम्ही गेले पाच दिवसांपासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करत आहोत या ठिकाणी आमची चौकशी करण्यासाठी उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना वेळ मिळत नाही व ते या कार्यालयास आलेले आम्हाला दिसून येत नाहीत. शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांना वेळ मिळत नाही परंतु रात्री दहा ते अकरा वाजेपर्यंत यांना कार्यालयामध्ये पार्ट्या करण्यासाठी वेळ मिळत आहे असा आरोपही उपोषणकर्त्यांनी केला आहे. शाहू रघुनाथ गायकवाड यांची मागील तीन दिवसापूर्वी तब्येत खालावल्यामुळे त्यांना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार चालू आहेत. शनिवार रोजी उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. पाटील व डॉ. हजारे यांच्यासह कर्मचारी यांनी उपोषणकर्त्यांची तपासणी केली असता अजित विलास रांजणकर यांची प्रकृती खालावत आहे त्यामुळे त्यांनी उपचार घ्यावेत अशी डॉक्टरांनी त्यांना विनंती केली आहे.

> मागील दोन दिवसांपूर्वी तहसील कार्यालया समोर उपोषण करणाऱ्या कुटुंबातील एका महिलेचा मृत्यू झाला आहे. आता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता व उपअभियंता यांना आमची सदर प्रकरणाची पुनरावृत्ती करायची का? काय आज रोजी आमच्या दुसऱ्याही उपोषणकर्त्यांची तब्येत खालवली आहे असे डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर सांगितले आहे जर आमच्या जीवितास काही धोका झाल्यास त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता व कनिष्ठ अभियंता जबाबदार राहतील.
> **उपोषण करर्ते अमर गायकवाड**




## जिल्हा क्रीडा संकुल परिसरात अज्ञातांचा हैदोस

### जिल्हा क्रीडा अधिकारी कसगावडे यांनी संबंधितावर स्वच्छता अभियान अंतर्गत केली कारवाई





लातूर :- जिल्हा क्रीडा संकुल मैदानाच्या परिसरात गुरुवारी २४ जुलै रोजी सकाळी अज्ञात तरुणांनी हलगी वाजवून, गुलाल उधळून हैदोस घातला. हा हैदोस बघून या परिसरातील लोक हे काय चालले म्हणून एकमेकात बोलत होते. क्रीडा संकुल परिसरात क्रीडाविषयक खेळाचे कार्यक्रम होत असतात परंतु येथे हालगी वाजवून गुलाल उधळल्या जातोय हे पाहून दक्ष नागरिक अमर सूर्यवंशी यांनी अटकाव करण्याचा प्रयत्न केला. हा विषय जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांना हा प्रकार समजताच अमर सूर्यवंशी यांना सांगून संबंधितांना थांबून घेण्यास सांगितले आणि क्रीडा संकुल परिसरात येऊन संबंधित लोकांना जिल्हा क्रीडा संकुल परिसरात हलकी वाजवणे वाद्य वाजविणे,फटाके फोडणे, नारीबाजी करणे,गोधळ घालणे वगैरे बंधनकारक असताना तुम्ही नियमबाह्य कृती का केली तुमच्यावर कारवाई का करू नये अशी समज देऊन कारवाईला बगल देऊन शासकीय स्वच्छता अभियाना अंतर्गत संबंधित व्यक्तींना क्रीडा संकुल परिसर साफ करून घेऊन तेथील कचरा कचराकुंडीत नेऊन टाकण्यास भाग पाडले आणि यापुढे अशी कृती केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल अशी समज जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी दिली जिल्हा क्रीडा अधिकारी कसगावडे हे अशी कृती करीत असताना पाहणाऱ्या लोकांनी प्रत्येक कार्यालयातील परिसरात अशी स्वच्छता राबविणारे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांच्यासारखे अधिकारी सर्वच जिल्हा कार्यालयात असावे अशी भावना व्यक्त करीत असताना दिसत होते.

## ५६ हजार रिक्त पदांसाठी भरती, लाड-पागे समितीचीही अंमलबजावणी



मुंबई : मुंबई महापालिकेतील विविध खात्यांतील ५६ हजार रिक्त पदे टप्प्याटप्प्याने भरण्यात येतील, असे आश्वासन मुंबई महापालिका प्रशासनाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांनी शुक्रवारी झालेल्या बैठकीत कामगार संघटनांच्या प्रतिनिधींना दिले. महापालिकेतील विविध खात्यांतील कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत डॉ. जोशी यांच्या दालनात ही बैठक झाली. म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे अध्यक्ष बाबा कदम आणि उपाध्यक्ष डॉ. संजय कांबळे–बापेरकर यांनी यावेळी कर्मचाऱ्यांचे प्रश्न मांडले. राज्य सरकारच्या धोरणानुसार सफाई, मलनिस्सारण, गटारे, स्मशानभूमी आदी ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्क नोकऱ्या दिल्या जाणार असल्याची माहितीही यावेळी जोशी यांनी दिली. उपायुक्तांसह अधिकारी उपस्थित या बैठकीस उपायुक्त किशोर गांधी, किरण दिघावकर, प्रमुख कामगार अधिकारी सुनील जांगळे, प्रमुख कर्मचारी अधिकारी शारदा गोसावी, प्रमुख लेखापाल, तसेच युनियनच्या वतीने खजिनदार महेंद्र पवार आणि मंदार गावकर उपस्थित होते. दावे निकाली काढणार नवीन पेन्शन योजनेअंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मागील दोन वर्षांपासून रखडलेले डीसी–१ देय दावे निकाली काढण्यासाठी सुधारित व सोपी नियमावली तयार करून लवकरच प्रसारित केली जाईल, असेही जोशी यांनी सांगितले. 'केईएम'मध्ये २६ वर्षे सेवा, कर्मचाऱ्यांची बदली एका जागी अनेक वर्षे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बदलीसंदर्भात पुढाकार घेतला आहे. सफाई खात्याच्या पी. टी. केस विभागातील तीन लिपिक आणि केईएम रुग्णालयात २६ वर्षे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची तत्काळ बदली करण्याचे आदेश जारी करण्यात आले. बदलीच्या परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी प्रशासनाने मान्य केली आहे, अशी माहिती डॉ. बापेरकर यांनी दिली.

## कव्हा येथील रंजनाबाई बरुरे या महिला शेतकऱ्याला शेत रस्ता नोंदीचा पहिला सातबारा




लातूर :- शेतरस्त्यामुळे होणारे वाद कमी करण्यासाठी राज्य सरकारने या रस्त्याच्या नोंदी शेतकऱ्याच्या सातबारावर इतर हक्कात घेण्याचा ऐतिहासिक निर्णय २२ मे २०२५ रोजी घेतला. या निर्णयाचा पहिला लाभ घेण्याचा मान कव्हा (ता. लातूर) शिवारातील महिला शेतकरी रंजनाबाई तुकाराम बरुरे यांना मिळाला असून त्यांच्या शेतासाठी मामलेदार कोर्ट कायद्यानुसार तहसीलदारांनी मंजूर केलेल्या दहा फुट रुंद व पाचशे फुट लांबीच्या शेतरस्त्याची नोंद त्यांच्या सातबारा उताऱ्यावरील इतर हक्कात घेण्यात आली आहे. यासोबत त्यांना हा रस्ता पोलिस बंदोबस्तात खुलाही करुन देण्यात आला. इतर हक्कात शेतरस्त्यांची नोंद घेतलेल्या पहिला सातबारा उपविभागीय अधिकारी रोहिणी नन्हे – विरोळे यांच्या हस्ते बुधवारी २४ जुलै रोजी बरुरे यांना देण्यात आला. तहसीलदार सौदागर तांदळे, नायब तहसीलदार सुधीर देशमुख, प्रवीण बरुरे या वेळी उपस्थित होते. रंजनाबाई बरुरे यांची कव्हा शिवारात गट नंबर ८६ मध्ये एक हेक्टर २९ आर जमीन असून ही जमीन पतीच्या निधनानंतर वारसा हक्काने ही जमीन रंजनाबाई व त्यांच्या विवाहित तीन मुलींच्या नावे झाली आहे. पती व दिरांमध्ये भाऊ वाटणी झाली तेव्हा त्यांच्या जमिनीला रस्ता देण्यात आला होता. वाटणीपत्रात तशी नोंदही होती. मात्र, रस्ता देण्यास विरोध सुरु झाला. यामुळे त्यांनी मामलेदार अधिनियम १९०६ च्या कलम पाचनुसार शेतरस्त्यावरील अतिक्रमण काढून देण्याची मागणी तहसीलदारांकडे केली. तहसीलदार तांदळे यांनी या प्रकरणी सुनावणी घेत रस्त्यासाठी जाग्यावर जाऊन पाहणी केली. त्यानंतर शेजारी शेतकऱ्यांनी रस्ता देण्यास व त्यावरील अतिक्रमण काढण्याची तयारी दाखवली. यामुळे तांदळे यांनी रस्ता खुला करून दिला व सात जुलै रोजी आदेश देऊन या शेतरस्त्याची नोंद सातबारावरील इतर हक्कात घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार कव्हा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी श्रीकांत उदाते यांनी ही नोंद घेतली व कन्हेरीचे मंडळ अधिकारी रफिक शेख तो सोमवारी २१ जुलै रोजी मंजूर केली. बुधवारी हा सातबारा उपविभागीय अधिकारी नन्हे यांच्या हस्ते रंजनाबाई बरुरे यांना देण्यात आला. २२ मेच्या शासन निर्णयानुसार इतर हक्कात शेतरस्त्याची नोंद घेण्यात आली असून यानिमित्ताने या निर्णयाचा जिल्ह्यातील पहिला लाभ बरुरे यांना मिळाल्याचेही मंडळ अधिकारी शेख यांनी सांगितले. बैलगाडी नाही तर ट्रॅक्टर रस्ता मिळाला सरकारने २२ मेच्या निर्णयानुसारच गाडीरस्त्याऐवजी ट्रॅक्टर रस्ता मंजूर करण्याचे आदेश दिले होते. मामलेदार कोर्ट कायद्यानुसार पूर्वीपासून बैलगाडीचा विचार करुन सव्वाआठ फूट रुंदीचा रस्ता मंजूर करण्यात येत होता. शेतीतील यांत्रिकरणामुळे बैलगाडीऐवजी ट्रॅक्टर व इतर वाहने जाण्यासाठी दहा ते १३ फूट रुंदीचा शेतरस्ता मंजूर करण्याचे आदेश निर्णयानुसार दिले होते. विशेष म्हणजे शेतरस्त्याची इतर हक्कात नोंद व ट्रॅक्टर रस्त्यासाठी औसा विधानसभेचे लोकप्रिय आमदार अभिमन्यू पवार यांनी पाठपुरावा केला होता. या निर्णयाचा लाभ बरुने यांना यानिमित्ताने मिळाला आहे. तहसीलदार तांदळे यांनी मामलेदार कोर्ट कायदा व शासन निर्णयानुसार जिल्ह्यात पहिल्यांदाच दहा फुट रुंद शेतरस्ता मंजूर केला आहे. शासन निर्णयाचा लाभ महिला शेतकऱ्याला तत्परतेने दिल्याबद्दल तहसीलदार तांदळे, मंडळ अधिकारी शेख व तलाठी उदाते यांचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे व उपविभागीय अधिकारी रोहिणी नन्हे यांनी कौतुक केले आहे.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## अवकाशातील लढाईची तयारी

अवकाशात स्थापन केलेल्या अवकाश स्थानकाच्या माध्यमातून भविष्यात काही देशांकडून क्षेपणास्त्र हल्ले होण्याची शक्यता पाहता भारतदेखील अवकाश क्षेत्रात पावले टाकताना दिसत आहे. आपण इतरांपेक्षा अधिक काळ मागे नाही. दहा वर्षांत आत स्वत:च्या अवकाश स्थानकात स्वत:चे अंतराळवीर उतरवण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी भारतीय शास्त्रज्ञांचे प्रयत्न शेवटच्या टप्प्यात असून अंतराळवीर शुभांशू शुक्ला परतल्यानंतर या अवकाश कार्यक्रमाला आणखीच उत्साह आला आहे. एकुणातच ही मोहीम दहा वर्षांत तडीस पोहोचू शकते आणि अवकाशातदेखील भारत यशाचे शिखर पादाक्रांत करू शकतो.

आत्मनिर्भरच्या दृष्टीने वाटचाल करताना जमिनीपासून हजारो किलोमीटर लांबीवर अवकाशात भारताचे स्थानक असेल. 'इस्रो'कडून २०३५ पर्यंत अवकाशात स्वत:चे स्पेस स्टेशन स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. अर्थात, शुभांशू शुक्ला हे नासाच्या अधिकृत मोहिमेच्या मदतीने नुकतेच अवकाश स्थानकात जाऊन आले. हा अवकाशस्थानक स्थापनेच्या प्रक्रियेचाच एक भाग आहे. भविष्यात एखादा अंतराळवीर अवकाशात प्रवास करेल तेव्हा तो स्वत:च्याच अवकाश स्थानकात उतरेल. अशा प्रकारचे यश हे बदलत्या भारताची अलौकिक कामगिरी मानली जाईल.

सध्याच्या काळात बहुतांश देश जमिनीऐवजी आकाशातून संघर्ष करत आहेत. समोरासमोरची लढाई टाळत क्षेपणास्त्रे डागली जात आहेत. इराण, इस्रायल, गाझा, पॅलेस्टिनी, युक्रेन-रशिया आणि अलीकडचे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव आणि शस्त्रसंधी हे त्याचेच उदाहरण आहे. म्हणूनच आगामी संघर्षाच्या ठिणग्या अवकाशात पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. आतापर्यंत दोन देशांतील संघर्ष हा आपण जमीन, हवा आणि पाणी यावरच पाहिले; परंतु भविष्यातील लढाई अवकाशातून लढली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. आतापर्यंत दोनच स्थानक अवकाशात आहेत. पहिले इंटरनॅशनल स्पेस स्टेशन आणि ते अमेरिका अणि रशिया यांच्या संयुक्त प्रयत्नातून साकारास आले. दुसरे स्थानक चीनचे असून ते खासगी आहे. अर्थात, आता रशिया, अमेरिका, भारत अणि अन्य एक देश आपापले खासगी स्थानक तयार करण्याच्या शेवटच्या टप्प्यात पोहोचले आहेत.

पुढील दहा वर्षांत भारताबरोबरच रशियादेखील स्वत:चे स्थानक स्थापन करेल. त्याचा उद्देश हा अवकाशातील प्रयोग करण्याचा असला, तरी या माध्यमातून काही उपग्रहांना क्षेपणास्त्र हाताळण्यासाठी कामाला लावले जाण्याची शक्यता आहे. तूर्त ४१ वर्षांनंतर शुभांशू शुक्ला यांच्या रूपातून भारताचा एक अंतराळवीर अवकाशात जाऊन आला. त्यांच्या अवकाश प्रवासाचे माध्यम ॲक्सिओम मिशन-४ का असेना; परंतु भविष्यात परकी यानावरचे अवलंबित्व संपण्याची शक्यता आहे. पृथ्वीपासून अवकाशस्थानक ६२ मैल अंतरावर असून ते गाठण्यासाठी २८ तास लागतात. एवढ्या मारक क्षमतेचे क्षेपणास्त्र अमेरिका तयार करत आहेत.

अवकाशात २४ तासांत १६ वेळेस सूर्योदय होतो आणि १६ वेळेस सूर्यास्त होतो. ९०-९० मिनिटांचा दिवस आणि रात्र असते. अवकाशस्थानक २४ तासांत पृथ्वीला सुमारे १६ वेळेस प्रदक्षिणा घालते. उपग्रह क्षेपणास्त्राचा वापर अवकाशातून कसा केला जाईल, यावर 'नासा'कडून बर्याच काळापासून अभ्यास सुरू आहे. 'इस्रो' आणि नासाचे शास्त्रज्ञ हे अवकाशात मानवी जीवन, ऑक्सिजन, पाणी उपलब्ध करून देण्यासंदर्भात चाचपणी करत आहे. अवकाशातून परतलेले शुभांशू यांची केवळ उड्डाणापुरतीच मोहीम नव्हती, तर ती एक भारतीय अवकाश संशोधनाच्या नव्या युगाची सुरुवात म्हणता येईल.

# २७ जुलै १९७८ हा नामांतर आंदोलनातील अविस्मरणीय ठराव दिन होय_ बी. बी. मेश्राम.

नामांतर आंदोलनाच्या ऐतिहासिक पाऊलखुणा तपासताना २७ जुलै १९७८ या तारखेला त्या आंदोलनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण याच दिवशी महाराष्ट्र राज्याच्या दोन्ही सदनात विद्यापीठाच्या नामांतराचा ठराव संमत करण्यात आला होता. ही बाब सामाजिक न्याय, ओळख, प्रतिष्ठा आणि बहुजन समाजाच्या हक्क अधीकाराशी निगडित आहे. या आंदोलनाचे पार्श्वभूमी समजून घेताना काही महत्त्वाचे ऐतिहासिक आणि सामाजिक घटक लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. ड्डूलेश्र `ष ज्ञ्पुेश्रशवसश अर्थात ज्ञानाचे प्रतीक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे संविधानाचे निर्माते असून समाज सुधारक व वंचित, पीडितांच्या आंदोलनाचे प्रणेते होते. ज्यांनी शैक्षणिक सुधारणा, मानवी हक्क, आत्मसन्मान, आत्मभान येण्यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय प्राप्त करून घेण्यासाठी सामाजिक जीवनात शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष केला परिणामी वंचित मूलनिवासी बहुजन समाजासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक प्रेरणादायी नेतृत्व ठरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ जुलै १९४५ ला पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती. ज्या अंतर्गत २० जून १९४६ ला मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची तर औरंगाबाद येथे १९ जून १९५० ला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली आहे. त्यावेळी मिलिंद महाविद्यालयाच्या पायाभरणी प्रसंगी गोविंद भाई श्रॉफ आणि माणिकचंद पहाडिया यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटीला आले होते. त्या शिष्टमंडळाने 'आपण हे जे महाविद्यालय सुरू करीत आहात, ते या ठिकाणी चालेल काय? असा शंकास्पद प्रश्न उपस्थित केला होता. तेव्हा बाबासाहेब आंबेडकर उद्गारले होते की, येथे केवळ एक महाविद्यालय उभारून चालणार नाही तर एक विद्यापीठ सुद्धा उभारले पाहिजे, अशी इच्छा व्यक्त केली होती. यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक दूरदृष्टी आपल्या लक्षात येते. त्यांनी जागतिक स्तरावरील उच्च कोटींच्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठातून ज्ञानार्जन केले होते. त्यामुळे सिम्बॉल ऑफ नॉलेज अर्थात ज्ञानाचे प्रतीक संबोधले जाते. तसेच, विद्यार्थी या शैक्षणिक संस्थेतून तयार व्हावेत जेणेकरून मानवतावादी आधुनिक समाज निर्माण करता येईल ही त्यांची अपेक्षा होती. १५ डिसेंबर १९५२ ला एल्फिन्स्टन कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनात आधुनिक विद्यार्थ्यांच्या समस्यांवर मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आधुनिक जगातील आवश्यकतेच्या पूर्ततेसाठी केवळ प्रशिक्षित कारकुनांची निर्मिती करणारे केंद्र चालवून काम भागणार नाही, तर शक्तीवर्धक ज्ञानाचे प्रतीक असणारे विद्यापीठ चालवावे लागतील. विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची उभारणी विद्यापीठातच होत असेल तर त्यांनी या अनुषंगाने फार सजग राहिले पाहिजे. विद्यापीठांच्या कारभारावर कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. विद्यापीठाने ठरविलेला निर्धारित अभ्यासक्रम शिकत असताना तो आपल्या बौद्धिक विकासाला खरोखरच पोषक व आवश्यक आहे किंवा नाही? याकडे पण चिकित्सकपने लक्ष केंद्रित केले पाहिजे. म्हणजे ज्ञानाची कास धरून आपल्या देशाचा विकास आणि उद्धार करून घ्यायचा असेल तर विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या कारभारात लक्ष घालून आपल्या हक्कांसाठी सतत झगडत राहिले पाहिजे. अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यापीठाची उपयोगिता कशी असावी? हे स्पष्ट केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांचे फलित म्हणून २३ आगस्ट १९५८ ला मराठवाड्यातील औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठाला काय नांव द्यावे? हे ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या शासकीय समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार मराठवाडा, औरंगाबाद, पैठण, प्रतिष्ठान, दौलताबाद, देवगिरी, अजिंठा, शालिवाहन, सातवाहन यासारखी स्थळ, भूमी व राज्यवाचक नांवे समोर आली होती. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महान व्यक्तींची नावे सुद्धा पुढे आली होती. मात्र यापूर्वीच कोल्हापूर येथील विद्यापीठाला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव दिले गेले असल्याने औरंगाबाद येथील विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नांवावर शिक्कामोर्तब करण्यासाठी राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात २७ जुलै १९७८ ला एकमताने ठराव संमत करण्यात आला होता.

ही ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता दक्खन-ए-खुसरू, मूल भारती संकल्पनेचे पितामह बी. श्यामसुंदर यांच्या नेतृत्वाखाली १ जानेवारी १९६५ ला नांदेड येथे संपन्न झालेल्या परिषदेत चार ठराव पास करण्यात आले होते. त्यापैकी तिसरा ठराव हा शेड्युल्ड कास्ट स्कॉलर व प्रामाणिक सहानुभूतीदार यांच्या नेतृत्वाखाली शेड्युल्ड कास्ट लोकांच्या विकासासाठी चालविले जाणारे विद्यापीठ त्वरीत निर्माण केले जावे. अशी भूमिका मांडण्यात आली होती. ज्यात डॉ. आंबेडकरांनी मुंबई व औरंगाबाद येथे सुरू केलेल्या महाविद्यालया सारखी महाविद्यालये इतरही राज्यात स्थापन व्हावीत. ज्यांना त्या त्या राज्यातील विद्यापीठांशी संलग्नित केली जावीत. तसेच डॉ. आंबेडकरांच्या नांवाने सुद्धा विद्यापीठ सुरू करावे. अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली होती. ज्याला २६ जानेवारी १९६८ ला नांदेड येथे संपन्न झालेल्या दि ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट कॉन्फरन्स मध्ये मंजुरी देण्यात आली होती. पुढे बी. श्यामसुंदर यांनी मूल भारती समाजाच्या उत्थानाकरिता लढा देण्यासाठी २९ एप्रिल १९६८ ला भारतीय भीम सेनेची स्थापना केली होती.



दरम्यान १९७२ च्या काळात दलितांना गायरान जमिनी मिळाव्यात, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करावी. गावातील पाणवठ्यांवर भेदभाव न करता पाणी भरू देण्यात यावे. यासारख्या समस्यांना तोंड देण्यासाठी दलित पँथर उदयास आली. त्याच काळात औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे ही मागणी पुढे आली. ती सामाजिक सन्मान, ओळख आणि समानतेचा प्रतिक होती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक कार्यासाठी, ज्ञानगंगा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून आपले संपूर्ण आयुष्य वेचले होते. म्हणून त्यांच्या नावे एक विद्यापीठ असावे, असे अनुयायाने वाटत होते. म्हणून ती मागणी रास्त होती. ज्याला दलित पँथर मधील तत्कालीन नेते राजा ढाले, नामदेव ढसाळ, प्रा. अरुण कांबळे, ज. वि. पवार, रामदास आठवले, गंगाधर गाडे सह इतर सर्व नेतृत्वाने नेटाने चालविण्याचा प्रयत्न केला. १९७४ च्या मराठवाडा विकास आंदोलनातही नामांतराची मागणी करण्यात आली होती. १९७७ ला तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मागणीची दखल घेऊन आश्वासन दिले होते. मात्र १९७८ ला सरकार बदलले आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार सत्तारूढ झाले. विधान परिषदेत आमदार पा. ना. राजभोज यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करावे अशी मागणी लावून धरली होती. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतराबाबत पुढाकार घेऊन राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात २७ जुलै १९७८ ला नामांतराचा ठराव मंजूर करून घेतला.

मात्र याची वार्ता समाजजीवनात पसरताच विघ्नसंतोषी समाजविघातक सवर्णांनी विद्यापीठाला केवळ एखाद्या व्यक्तीचे नाव देणे पक्षपाती ठरेल, असा युक्तिवाद करून नामांतराच्या मागणीला प्रखर विरोध केल्याने सरकारला अंमलबजावणी करणे अशक्य झाले. परिणामी संघर्ष सुरू होऊन दलितांवर अनन्वित अत्याचार करण्यात आले. नांदेड येथील दलित पँथरचे भीम सैनिक गौतम वाघमारे यांनी भर चौकात स्वतःला जाळून घेतले. परभणी जिल्ह्यातील पोचिराम कांबळे यांचे समाज कंटकांनी हात पाय तोडले आणि जर्जर करून ठार मारले. जनार्दन मवाडे, संगीता बनसोडे, सुहासिनी बनसोड, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, चंदर कांबळे, दिलीप रामटेके, रोशन बोरकर असे अनेक क्रांतिवीर नामांतरासाठी शहीद झाले. या अनुषंगाने प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लाँगमार्च काढला होता. त्या लाँगमार्चला बुलढाणा जिल्ह्यातील रायरीच्या पुलावर अडविण्यात आले होते. त्यातील आंदोलकांना अटक करून राज्यातील विविध कारागृहात डांबण्यात आले होते. त्यामुळे प्रा. जोगेंद्र कवाडे यांना लाँगमार्च प्रणेते असे म्हटले जाते.

शेवटी १७ वर्षाच्या प्रदीर्घ आंदोलनाच्या संघर्षानंतर १४ जानेवारी १९९४ ला 'मराठवाडा विद्यापीठाचा' विस्तार मराठवाडा हा शब्द कायम ठेवून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. असा नामविस्तार करण्यात आला. या आंदोलनामुळे जनजागृती होऊन सामाजिक समतेच्या लढ्याला बळ प्राप्त झाले. ही सर्व पार्श्वभूमी व इतिहास लक्षात घेतल्यावर नामविस्तार तर झाला पण त्यामुळे आंदोलन संपले की काय? पुढे काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहिला आहे. त्याची समर्पक उत्तरे आपण कधी शोधणार आहोत किंवा नाही? ज्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव दिलेले आहे. त्या विद्यापीठात बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान, विचारधारा किती प्रमाणात आणि कशाप्रकारे शिकविल्या जात आहे? विद्यापीठात महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा संशोधन केंद्र आहे. त्या अंतर्गत महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यात बोटावर मोजता येतील एवढेच विद्यार्थी प्रवेश घेत असतात? म्हणजे विद्यापीठात अनेक विभागात ज्या प्रमाणात विद्यार्थी प्रवेश घेतात त्याचा विचार केला असता सर्वात कमी विद्यार्थी प्रवेश घेणारा विभाग म्हणजे महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा हा विभाग होय असे म्हटल्यास वावगे, अनुचित होणार नाही. ज्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिलेले आहे त्याच विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा शिकविण्याविषयी असणारी अनास्था अनाकलनीय आहे. या अनुषंगाने विद्यापीठात कार्यरत असणारे विद्वान प्राध्यापक मंडळी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, कुलगुरू, कुलसचिव व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी यावर विचार केला पाहिजे. संबंधित विषयाची एवढी दुरावस्था का? याची कारणे शोधून काढली पाहिजेत. त्या विषयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नेट, सेट, पेट परिक्षा देता येतात काय? नुकत्याच विद्यापीठाने २०२४ मध्ये घेतलेल्या पेट परिक्षेत 'महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा' आणि 'पाली एंड बुद्धिजम' या विषयाचा नामोल्लेख सुद्धा टाळण्यात आला होता. म्हणजे यासारख्या विषयात विद्यार्थ्यांनी संशोधन करू नये, अशी विद्यापीठाची भूमिका असल्याची त्या पेटच्या नोटिफिकेशन्स मधून स्पष्ट झालेले आहे. विद्यापीठ त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व महाविद्यालयांना हे विषय शिकविण्यासाठी विशेष उपाययोजना करणार आहे काय? बार्टी सारख्या स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर संशोधन करण्यासाठी किती निधी खर्च करतात? यु जी सी सारख्या संस्था यासारख्या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी प्रयत्नशील आहेत काय? भारतातील सर्व केंद्रीय, राज्य, माहिती तंत्रज्ञान व मुक्त विद्यापीठ, खुले विद्यापीठे, विशेष विद्यापीठे तसेच खाजगी विद्यापीठातून सदरील विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत? या विषयात शैक्षणिक अर्हता प्राप्त करणा-या विद्यार्थ्याना विविध नौक-यात सामावून घेतले पाहिजे. या विषयांत प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभात गौरव करण्यात आला पाहिजे. जेणेकरून विद्यार्थी संबंधित विषयात शिक्षण घेण्यासाठी पुढे येऊ शकतील. अशा सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे शोधून उपाययोजना केल्या तर या माध्यमातून सुद्धा विद्वान, प्रज्ञावान, शीलवान, चारित्र्यसंपन्न आंबेडकराईट निर्माण होऊ शकतील. ज्ञानाचे प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महासागरातून वेचलेले वैचारिक अनमोल मोती आपल्या जीवनात आकार देण्यासाठी सक्षम असल्याने ते समजून घेणे आवश्यक आहे. ही आपल्या जीवनाची प्राथमिकता असावी. ज्याची समाजाला नितांत आवश्यकता आहे. परिणामी भारताचे संविधानाला अपेक्षित आधुनिक भारतीय समाजाची निर्मिती होऊ शकेल.

जय भीम!
जय भीम!!
जय भीम!!!

************

लेखक : बी. बी. मेश्राम, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, नॅशनल कौन्सिल नंबर ऑफ द ऑल इंडिया नाग असोसिएशन, (आईना) छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र, ४३१००२.
संपर्क : ९४२१६७८६२८ (उ), ८९८३०८२१२८ (थह).


# आपण संवेदनशील पुरुष घडविण्याचा प्रयत्न करणार की नाही?

ओडिशात एका महाविद्यालयीन विद्यार्थिनीने स्वत:ला जाळून घेऊन प्राध्यापकाकडून होणाऱ्या छळातून सुटकेसाठी आत्महत्या केल्याचे प्रकरण ताजे असताना, त्याच राज्यात पुरी येथे अन्य एका मुलीला 'मित्राला भेटायला जाते' म्हणून रस्त्यात अडवून जाळण्याचा प्रयत्न झाला आहे. दिल्ली राजधानी क्षेत्रातील नोएडा येथील शारदा युनिव्हर्सिटीत दंतवैद्यक शाखेत शिकणाऱ्या मुलीने कर्मचाऱ्यांकडून छळ होतो म्हणून आत्महत्या केल्याचेही उघड झाले आहे. या साऱ्याजणी पुरुषी मानसिकतेच्या बळी आहेत, हे उघडच आहे. या निमित्ताने एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न पुन्हा एकदा समोर येतो - आपण संवेदनशील पुरुष घडवण्याच्या दिशेने काही ठोस पावले उचलतो आहोत का?

भारतीय समाजरचनेच्या मुळाशीच असलेली लिंगाधिष्ठित उतरंड ही केवळ स्त्रियांना दुय्यम वागणूक देत नाही, तर ती संपूर्ण समाजाच्या मानसिकतेवर खोलवर परिणाम करते. लहानपणापासून मुलांमध्ये 'पुरुषत्व' म्हणजे ताकद, करडी भूमिका, भावना न दाखवणे आणि वर्चस्व गाजवणे, असा समज नकळतपणे बिंबवला जातो. मुलींसाठी नाजूकपणा, सहनशीलता, समजूतदारपणा या गुणांना महत्त्व देणाऱ्या सामाजिक प्रतिमा तयार केल्या जातात. याच प्रतिमांमधून पुढे जाऊन स्त्रियांना कमी लेखण्याचा, त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा विचार जन्म घेतो.

आज आवश्यक आहे तो सामाजिकरणाच्या प्रक्रियेचा पुनर्विचार करण्याची. मुलगा असो वा मुलगी, दोघांनाही समतेचे, सहवेदनेचे, माणुसकीचे आणि परस्पर सन्मानाचे संस्कार देणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये, माध्यमे, धर्मस्थळे आणि घरे - प्रत्येक ठिकाणी लिंगभाव संवेदनशीलतेचा आवाज बुलंद होणे आवश्यक आहे. तळवशे: लता मंगेशकर यांच्या 'आजा पिया' गाण्यावर वल्लरी विराजचा ऑनस्क्रीन बहिणीसह सुंदर डान्स; नेटकरी म्हणाले, नजर नको

संवेदनशील पुरुष म्हणजे केवळ रडणारा किंवा भावना व्यक्त करणारा नव्हे, तर ती अशी व्यक्ती आहे जी स्वतःच्या सत्ताधारित विशेषाधिकारांची जाणीव ठेवते, त्याचा उपयोग समाजातील वंचित घटकांसाठी करते, स्त्री-पुरुष समतेच्या विचारांवर ठाम राहते आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवते. संवेदनशील पुरुष ही संकल्पना अशा समाजाच्या उभारणीसाठी अत्यावश्यक आहे जिथे कोणालाही केवळ त्यांच्या लिंगामुळे दडपले जाणार नाही. स्त्रियांच्या सुरक्षेसाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत. मानसिकतेचा बदल झाला पाहिजे. हा बदल होण्यासाठी संवाद, शिक्षण, चर्चा, आणि सर्वात महत्त्वाचं - स्वतःपासून सुरूवात करणे आवश्यक आहे. कुटुंबातील पुरुष सदस्यांनी स्त्रियांना समजून घेणं, त्यांच्या मतांचा आदर करणं, आणि घरकाम किंवा मुलांच्या संगोपनासारख्या कामांमध्ये सक्रिय सहभाग घेणं - हे कृतीतून समतेचा संदेश देणारं उदाहरण ठरू शकतं. मुलं काय पाहतात, काय ऐकतात, काय अनुभवतात - हेच त्यांचं जग घडवतं. त्यामुळे जर समाजात, कुटुंबात आणि शाळांमध्ये समतेचा विचार आणि व्यवहार रुजवला गेला, तर संवेदनशीलतेच्या प्रक्रियेला गती येऊ शकते. अर्थात, हा बदल एका रात्रीत घडणारा नाही. पण या दिशेने ठाम, सातत्यपूर्ण पावले उचलली गेली तर आपण भविष्यात एक अधिक समंजस, समतेवर आधारित आणि भयमुक्त समाज घडवू शकतो. समाजाच्या परंपरागत, पुरुषप्रधान चौकटी आजही इतक्या बळकट आहेत की त्यांच्याविरोधात उभं राहणं अनेकांसाठी धाडसाचं आणि अशक्य वाटणारं काम ठरतं. परंतु, जर खरंच आपण बदल घडवण्याची इच्छा बाळगत असू, तर या समाजदबावाच्या भिंती तोडून समतेच्या आणि न्यायाच्या बाजूने उभं राहणं हे केवळ आवश्यकच नाही, तर तेच मानवी असण्याचं खऱ्या अर्थानं लक्षण ठरतं. समाजदबाव हे अन्यायाच्या व्यवस्थेचं एक प्रमुख शस्त्र आहे. आपण जर सतत बहुसंख्य समाजाच्या मतांच्या आधारावर 'बरोबर' आणि 'चूक' ठरवत राहिलो, तर कधीच अन्यायाला आव्हान देता येणार नाही. इथेच न्याय, समता, माणुसकी या मूल्यांची खरी कसोटी लागते.



आज आपल्या समाजात किती जण असे आहेत जे वडील म्हणून मुलीच्या स्वप्नांना पंख देतात? किती शिक्षक आहेत जे लिंगभाव समतेबाबत मुलांशी मोकळं आणि संवेदनशील बोलतात? किती तरुण आहेत जे मित्र म्हणून, सहकारी म्हणून किंवा पती म्हणून स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून समजून घेतात?

या सर्वांसाठी समाजदबावाच्या चौकटी मोडाव्या लागतात. कधी निंदा, कधी उपहास, कधी बहिष्कार - या सगळ्यांचा सामना करत, आपली भूमिका बदलण्याचं धाडस दाखवावं लागतं. आपण जर खरोखर संवेदनशील समाज घडवायचा असेल, तर माझं काय जाणार? ही भूमिका सोडून, माझ्या कृतीने समाजाचा चेहरा थोडाफार का होईना, बदलू शकतो या जाणीवेने प्रत्येकाने पाऊल उचलणं गरजेचं आहे. अन्यायाविरुद्ध शांत राहणं म्हणजे त्या अन्यायाला समर्थन देणं- हे लक्षात घेतलं पाहिजे. समाजाचा दबाव, लोकांचं मत, कुटुंबाचा रोष या सगळ्यांपलीकडे जाऊन समतेसाठी, न्यायासाठी, मानवी स्वातंत्र्यासाठी ठाम उभं राहणं - हाच खरा परिवर्तनाचा आरंभ आहे. आणि अशा प्रत्येक कृतीतून संवेदनशील पुरुष आणि संवेदनशील माणूस घडतो. हा प्रवास अवघड असला तरीही त्याशिवाय पर्याय नाही.

अखेर, आपल्याला असा समाज हवा आहे जिथे 'मुलगी जिवानिशी जात नाही', तर ती माणूस म्हणून जिवंतपणे, मुक्तपणे, सन्मानाने जगते. आणि हे घडवण्यासाठी प्रत्येक पुरुषाचं मन संवेदनशील होणं - हीच खरी क्रांती आहे!

# भर पावसात उभे राहून रा.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांनी रस्त्यावर साठलेला पाण्याचा प्रश्न लावला मार्गी


केज/प्रतिनिधी केज शहरातून कानडी,लव्हुरी येवता,विडा जाणारा मुख्य रस्ता आहे, या रस्त्यावरून मोठी वाहनांची गर्दी, वर्दळ असते या रस्त्याचे जवळपास एक वर्षापासून काम चालू चालू आहे परंतु गेले कीत्येक महिने झाले सदरील रस्त्याचे व नाल्याचे काम तात्काळ लवकर करणे गरजेचे असताना गुत्तेदाराच्या मनमानी कारभारामुळे व बांधकाम विभागाच्या चुकीच्या धोरणामुळे शहरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थी, नागरिकासह वाहन चालकांना सदर रस्त्याचे काम चालू असल्यामुळे व पावसामुळे तारेवरची कसरत करावी लागत आहेत या रस्त्याने अनेक अपघात घडले आहेत तरी संबंधित कंपनी व सार्वजनिक बांधकाम उपविभाग हे बागेची भूमिका घेत आहेत. या परिसरातील नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी अनेक वेळा तक्रारी करून काम आडूनही सदर गुत्तेदार आणि बांधकाम विभाग संगणमत करून सदर रस्त्याचे काम उत्कृष्ट कॉलिटी चे करत नाहीत असे या भागातील नागरिकांतून बोलले जात आहे. मागील दोन ते तीन दिवसापासून सतत पाऊस चालू आहे, पावसाने अख्खा कानडी रोड जलमय झाला यामध्ये मुख्य चूक ही गुत्तेदार एस कन्स्ट्रक्शन ची आहे तर याला पाठीशी घालणारे बांधकाम विभागाचे कर्मचारी हेही तेवढेच गुन्हेगार आहेत. हे बोल चुकीचे ठरणार नाही कारण कित्येक वेळेस या रस्त्यासाठी आंदोलन केली परंतु यांच्या डोळ्यावर लावलेली पट्टी निघालीच नाही का? असा सवाल या भागातील नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. शुक्रवार रोजी पहाटेपासून पाऊस चालू असल्यामुळे विजय कृषी सेवा केंद्र ते पारस स्वीट होम या परिसरामध्ये पावसाचे पाणी साठवून तलावाचे स्वरूप आले होते त्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली होती व शाळेतील विद्यार्थ्यांना रस्त्याने चालता येत नव्हते. सदर प्रकरणाची काही नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते हारुणभाई इनामदार यांना माहिती दिली सदर माहिती मिळताच इनामदार हे नगरपंचायत च्या कर्मचाऱ्यासह जीसीबी मशीन घेऊन सदर ठिकाणी पोहोचले व इनामदार हे भर पावसात उभा राहून ठीक ठिकाणी पावसाचे साठलेले पाणी कर्मचाऱ्यांच्या व जेसीबी मशीनच्या साह्याने रस्त्याची व नालीची दुरुस्ती करून पाण्याला वाट करून दिली. शहरातील नागरिकांनी नगराध्यक्ष बनसोड व इनामदार यांना एक फोन केला की, प्रॉब्लेम सॉल होत आहे असे त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या युवकातून चर्चा ऐकण्यास मिळाल्या आहेत. यावेळी हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी तात्काळ दखल घेऊन काम मार्गी लावल्याबद्दल नागरिकांनी त्यांचे व नगरपंचायतचे कर्मचारी यांचे आभार व्यक्त केले व त्यांच्या कामाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.




# जलद गतीच्या व्यायामामुळे रक्तातील साखर वाढू शकते? तज्ज्ञांनी काय सांगितले..

रक्तातील साखर नियंत्रित ठेवताना आहारासह व्यायाम हा देखील योग्य पर्याय म्हणून सुचवला जातो. चालणे, योगासन करणे आणि जास्त हालचालींचे बहुतेक प्रकार शरीराला ग्लुकोजचे चांगले नियमन करण्यास मदत करतात. परंतु, नियमित व्यायामाचे फायदे लाभदायी सिद्ध झाले असले तरी जास्त व्यायाम केल्याने रक्तातील साखरेची समस्या असलेल्यांसाठी फायद्यापेक्षा जास्त नुकसान होऊ शकते का, हे समजून घेणे आवश्यक आहे.

जीममध्ये जास्त व्यायाम केल्याने तुमच्या ग्लुकोज नियंत्रणात अडथळा येऊ शकतो का?



मधुमेह शिक्षक आणि आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा इंडियन एक्स्प्रेस.कॉमला सांगतात की, अत्यंत तीव्र व्यायामामुळे (उदा. धावणे, जास्त हालचालींचे व्यायाम) तात्पुरते हायपरग्लाइसेमिया होऊ शकते. एड्रेनालाईन आणि कॉर्टिसॉल यकृताद्वारे ग्लायकोजेनोलिसिस आणि ग्लुकोनोजेनेसिसद्वारे ग्लुकोज उत्पादन सुरू करतात, ज्यामुळे इन्सुलिन-मॉड्युलेटेड ग्लुकोज अपटेकचे परिणाम टाळता येतात. ग्लुकोजचे प्रमाण कमी होण्याचे कारण, शरीर उच्च-तीव्रतेच्या व्यायामाला शारीरिक ताण म्हणून पाहते.

त्या पुढे म्हणतात की, व्यायामानंतरचा वाढता वेग सामान्यतः तात्पुरता असतो (व्यायामानंतर ३० ते १२० मिनिटे) आणि जेव्हा ग्लुकोजच्या एकाग्रतेपासून सुरुवात होते ( १८० मिग्रॅ/डेसीएल) तेव्हा तो दीर्घकाळ टिकू शकतो. कमी ते मध्यम तीव्रतेच्या गैर-व्यायाम क्रियाकलापांचा परिणाम होत नाही, कारण ते तणाव संप्रेरकांपेक्षा स्नायूंमध्ये ग्लुकोजचे सेवन जास्त करते.

तळवशे: लता मंगेशकर यांच्या 'आजा पिया' गाण्यावर वल्लरी विराजचा ऑनस्क्रीन बहिणीसह सुंदर डान्स; नेटकरी म्हणाले, नजर नको

इन्सुलिन प्रतिरोधकता किंवा मधुमेह असलेल्या लोकांसाठी जोखीम असते, जेव्हा ते खूप तीव्र व्यायाम करतात.

मधुमेह असलेल्या लोकांसाठी तीव्र व्यायाम विशेषतः धोकादायक आहे, असे मल्होत्रा मान्य करतात. त्या पुढे म्हणतात, ग्लुकोजच्या वाढीव सुरुवातीच्या (२०० मिग्रॅ/डेसीएल) उपस्थितीत ॲथलेटिक प्रयत्न कॅटेकोलामाइन-उत्तेजित यकृतातील ग्लुकोज उत्पादनामुळे हायपरग्लाइसेमिया वाढवू शकतात. व्यायामानंतर हायपोग्लाइसेमियाचा धोका (४-२४ तासांनंतर) स्नायू/यकृतातील ग्लायकोजेन साठ्यात घट झाल्यामुळे होतो, विशेषतः जेव्हा इन्सुलिन/औषधे सुधारित केली जात नाहीत.

त्या पुढे म्हणाल्या की, रक्तातील ग्लुकोजची पातळी कमीत कमी २५० ाास/वङ असताना आणि शोधता येण्याजोग्या केटोन्सच्या उपस्थितीत शारीरिक हालचाली केल्याने टाइप १ मधुमेह असलेल्या रुग्णांमध्ये केटोॲसिडोसिस होऊ शकतो . कमी व्यायामापूर्वी कार्बोहायड्रेट्स किंवा पुनर्प्राप्ती वेळेमुळे हे वाढते.

तसेच, मधुमेहाच्या वेगाने होणाऱ्या वाढीमुळे शरीरावर तीव्र शारीरिक ताण येतो तेव्हा हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी प्रणालीवर ताण वाढतो. हार्मोनल प्रतिक्रिया आणि पचनातील कमकुवतपणा यांना ग्लुकोजशी संबंधित बारकाईने निरीक्षण करून सामोरे जावे, जेणेकरून येणाऱ्या गुंतागुंती टाळता येतील, असा मल्होत्रा जोर देतात.

निरोगी संतुलन कसे राखायचे? मल्होत्रा म्हणतात, रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी सायकलिंग किंवा पोहणे यासह मध्यम एरोबिक व्यायाम हा ग्लुकोजची पातळी कमी ठेवण्यासाठी आणि -१उ पातळी सुधारण्यासाठी परिपूर्ण सुरुवात आहे. पूरक म्हणून उच्च तीव्रतेचे २-३ सत्र (२० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी) जोडा आणि त्यापैकी कोणत्याही २ दरम्यान किमान ४८ तास वाट पाहा. व्यायामाच्या प्रतिकूल स्वरूपाचे संकेत म्हणजे व्यायामानंतर हायपरग्लाइसेमिया (२५० ाास/वङ पेक्षा जास्त), हायपोग्लाइसेमिया (७० ाास/वङ पेक्षा कमी), सतत थकवा, वाढलेली तहान, केटोन्सची उपस्थिती किंवा दुपारच्या व्यायामानंतर रात्रीच्या हायपोग्लाइसेमिया.

व्यायामापूर्वी आणि नंतर धोका कमी करण्यासाठी ग्लुकोजची पातळी तपासणे योग्य आहे. जेव्हा व्यायामापूर्वी ग्लुकोजची एकाग्रता १०० मिलीग्राम/डीएलपेक्षा कमी असते, तेव्हा १५ ग्रॅम कार्बोहायड्रेट्स वापरा. मध्यम व्यायामाच्या कालावधीपूर्वी बेसल इन्सुलिन (अर्ध्याने) कमी करणेदेखील फायदेशीर ठरू शकते, असे मल्होत्रा यांनी सांगितले.

# तुम्हीही रिकाम्या पोटी केळी खाताय?, मग वाचा तज्ज्ञांचा इशारा



रोजच्या धावपळीच्या, जीवनात अनेकदा सकाळच्या वेळी रोज नाश्ता करणे शक्य होत नाही. अशा वेळी आपण पटकन एखादे फळ खातो आणि दिवसाला सुरुवात करतो. फळे ही आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. पण, कोणतेही फळ खाण्याची एक योग्य वेळ असते. अनेक जण सकाळी केळे खातात. पोषक घटकांनी समृद्ध असलेली केळी हा बहुतांशी परिपूर्ण नाश्ता मानला जातो. पण, तुम्ही केळे रिकाम्या पोटी खावे का? चला, याबाबत तज्ज्ञांकडून जाणून घेऊया. केळी नैसर्गिक साखर, पोटॅशियम व फायबर यांनी समृद्ध असतात, ज्यामुळे ते एक उत्तम ऊर्जावर्धक फळ ठरते. पण, रिकाम्या पोटी ते खाणे आदर्श असू शकत नाही, असे क्लिनिकल आहारतज्ज्ञ गरिमा गोयल यांनी सांगितले.

केळ्यामध्ये विशेषतः पिकलेल्या केळ्यामध्ये त्यांच्या नैसर्गिक साखरेमुळे (ग्लुकोज, फ्रुक्टोज व सुक्रोज) उच्च ग्लायसेमिक इंडेक्स असतो. रिकाम्या पोटी केळे खाल्ल्यामुळे रक्तातील साखरेमध्ये जलद वाढ होऊ शकते. त्यानंतर अचानक रक्तशर्करेच्या या पातळीत घट होऊ शकते, ज्यामुळे तुम्हाला लवकरच आळस येऊन, भूक लागते,अस गोयल यांनी सांगितले.

# घरच्या घरी ब्लड प्रेशर कसे तपासावे? योग्य रीडिंगसाठी तज्ज्ञांनी सांगितल्या महत्त्वाच्या टिप्स

सध्याच्या धावपळीच्या आयुष्यात आपण आरोग्याकडे आणि आहाराकडे दुर्लक्ष करतो, त्यामुळे अनेक आरोग्याच्या समस्या वाढताना दिसत आहेत. रक्तदाब हा असा दीर्घकालीन आजार आहे, ज्यासाठी वारंवार तपासणी करणे गरजेचे आहे. ज्या लोकांना उच्च रक्तदाब किंवा कमी रक्तदाबाचा त्रास आहे त्यांनी नियमित रक्तदाब तपासणे गरजेचे आहे. रक्तदाब कमी होणे किंवा वाढणे दोन्हीही आरोग्यासाठी धोकादायक आहे.

सध्या दिवसेंदिवस रक्तदाबाशी संबंधित रुग्णांची संख्या वाढताना दिसत आहे. उच्च रक्तदाबाच्या समस्येकडे दीर्घ काळासाठी दुर्लक्ष केले तर हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक येण्याचा धोका वाढतो. उच्च रक्तदाब कंट्रोल ठेवण्यासाठी रक्तदाब दिवसातून दोनदा तपासणे खूप गरजेचे आहे. दिवसातून दोनदा रक्तदाब चेक करण्यासाठी डॉक्टरकडे जाणे अवघड वाटत असेल तर तुम्ही घरीच रक्तदाब चेक करू शकता. पण, तुम्हाला घरी रक्तदाब कसे तपासायचे माहितीये का? आज आपण त्याविषयी सविस्तर जाणून घेणार आहोत.

मुंबईच्या सर एच. एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमध्ये सल्लागार कार्डियक सर्जन डॉ. बिपीन चंद्र भामरे सांगतात की, लोकांना रक्तदाब तपासण्याची योग्य पद्धत माहीत नाही, ज्यामुळे चुकीची रीडिंग येते, जे आरोग्यास घातक ठरू शकते. तज्ज्ञांच्या मते, चुकीची बैठी जीवनशैली किंवा लघवी थांबवून ठेवणे यांसारख्या छोट्या छोट्या गोष्टींमुळे रीडिंग बदलू शकते. तज्ज्ञांनी सांगितल्या प्रमाणे घरात रक्तदाब कसा तपासावा?



घरच्या घरी रक्तदाब तपासण्याची योग्य पद्धत

१. सर्वात आधी रक्तदाब तपासण्यापूर्वी नेहमी मूत्राशय खाली करा. लघवी करून आल्यानंतर बीपी चेक करावा, तेव्हाच योग्य रीडिंग येईल.

खोटी तक्रार करत खझड महिलेनं पती-सासऱ्याला तुरुंगात पाठवलं; सरन्यायाधीशांनी फटकारलं, जाहीर माफी मागण्याचे दिले आदेश

२. रक्तदाब तपासण्यापूर्वी पाच मिनिटे शांत बसावे आणि आराम करावा.

३. रक्तदाब तपासण्यासाठी अशा खुर्चीचा वापर करा, ज्यामध्ये पाठीला आराम मिळेल आणि तुमचे दोन्ही पाय जमिनीवर सरळ स्थिर राहतील.

४. रक्तदाब तपासताना पायांना क्रॉस करू नका.

५. रक्तदाब तपासताना आपल्या हातापासून खांद्यापर्यंतचा भाग सरळ असावा. तुम्ही हाताला उशीचा आधार देऊन ठेवू शकता.

६. रक्तदाब तपासण्याचा स्फिग्मोमॅनोमीटर (कफ) योग्य आकाराचा असणे आवश्यक आहे आणि या कफला योग्य प्रकारे हाताला बांधले पाहिजे.

७. रक्तदाब तपासताना घाबरू नये. कोणताही ताण तणाव घेऊ नये आणि निवांत राहण्याचा प्रयत्न करावा.

८. रक्तदाब तपासण्यापूर्वी ३० मिनिटांपर्यंत बोलू नये, कॉफी पिऊ नये आणि धूम्रपान करू नये.

९. डॉ. भामरे सांगतात, एकाच वेळी दोनदा रक्तदाब तपासावे आणि मध्ये एक मिनिटाचे अंतर ठेवावे. त्यानंतर दोन्ही वेळचे सरासरी काढावे. दररोज एकाच ठराविक वेळेला रक्तदाब तपासणी केली तर अधिक चांगले.

१०. घट्ट कपडे परिधान करू नये.

डॉ. भामरे सांगतात, नियमित वेळेला रक्तदाब तपासल्याने व्यक्तीला आरोग्याविषयी जागरूक राहण्यास प्रेरणा मिळते. यामुळे व्यायाम, संतुलित आहार आणि तणाव नियंत्रित ठेवणे आणि निरोगी जीवनशैली स्वीकारण्यास मदत होते.

# सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त बाभळगाव ग्रामस्थांकडून हनुमानाला चांदीचा मुखवटा अर्पण

**राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख, धीरज देशमुख यांच्यासह बाभळगाव ग्रांमस्थासहित मान्यवरांची मोठी उपस्थिती**

लातूर :- राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी बाभळगावचे सुपुत्र असलेले उत्तुंग व्यक्तिमत्व दिलीपराव देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गावातील ग्रामस्थांच्या वतीने बाभळगाव येथील हनुमान मंदीरात चांदीचा मुखवटा राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख यांच्या हस्ते शनिवारी अर्पण करण्यात आला तत्पूर्वी ग्रामस्थाकडून गावातून श्रींची शोभायात्रा, रुद्राभिषेक, धार्मिक विधी मंत्रोच्चरात करण्यात आला यावेळी धार्मिक सोहळ्यास बाभळगाव ग्रामस्थ व पंचक्रोशीतील हजारो नागरिक, महिला मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते

यावेळी कार्यक्रमास माजी आमदार वैजनाथराव शिंदे, जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे , मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, नरसिंह देशमुख, शाम देशमुख,मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले उपाध्यक्ष सचिन पाटील,गणपतराव बाजुळगे,रेनाचे उपाध्यक्ष अँड प्रवीण पाटील, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, दयानंद बिडवे बाळासाहेब कदम संभाजी सुळ, सचिन दाताळ, महादेव मुळे बालाजी साळुंके, जोशी, थडकर, विकास देशमुख बाभळगाव येथील ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन सर्व संचालक यांच्या सह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला, ग्रामस्थ पुरुष मंडळी , भक्तगन मोठया संख्येने उपस्थित होते

बाभळगाव ग्रामस्थ हनुमंताच्या दर्शनासाठी भक्तिमय श्रावण महिना असल्याने गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला , जेष्ठ नागरिक, भक्त गण यांनी हनुमंताच्या दर्शनासाठी गर्दी केली होती हनुमंताला चांदीचा मुकुट अर्पण करण्यासाठी स्वतः माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब जिल्हा बँकेचे चेअरमन धीरज विलासरावजी देशमुख उपस्थित होते त्यामुळें आसपास परिसरात पाऊस असतानाही कार्यक्रमासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसत होती





# निराधार - अंध - अपंगाच्या मानधनात वाढ करण्याची मागणी..

निलंगा / प्रतिनिधी :- दिवसेंदिवस वाढत चाललेली महागाई यामुळे हतबल असहाय्य झालेले निराधार वृद्ध त्यात शासनाकडून मिळत असलेले तुटपुंजे मानधन यामुळे निराधार अंध अपंग परीतक्त्या यांची होत असलेली परवड थांबविण्यासाठी शासनाने निराधारांना दिल्या जाणाऱ्या निधीच्या नियमात बदल करावा त्यांना दिल्या जाणाऱ्या मानधनात वाढ करून प्रती महिना १० हजार मानधन देण्यात यावे अश्या मागणीचे निवेदन अखिल भारतीय मराठवाडा प्रदेश निराधार संघटनेचे संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष मधुकर कांबळे यांच्या नेतृत्वात तहसीलदार निलंगा यांना देण्यात आले आहे.




निवेदनात पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, तब्बल दहा महिन्याचा कालावधी संपला अद्याप मंजुरी बैठक घेण्यात आलेली नाही लाभार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्यात यावी व या योजनेतल्या लाभार्थ्यांच्या नियमात शिथिलता आणावी वार्षिक उत्पन्न २१ हजार रुपयांवरून एक लाखापर्यंत करण्यात यावे वय ६५ ऐवजी स६० करण्यात यावे लाभार्थ्यास एक हेक्टर जमीन मान्य करावी विकलांग किंवा अंथरणावर पडलेल्या लाभार्थ्यांना घरपोच मानधन पोचवावे तर असंख्य निराधार विधवा महिला या लाभांपासून वंचित आहेत त्यांचे वितरण करण्यात यावे अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी माधव (नाना) सूर्यवंशी, माधव चपटे, राम सूर्यवंशी, प्रशांत सोळंके, दत्तात्रेय कांबळे, लता कांबळे, नरसिंग कांबळे, गुंडप्पा ईश्वरे, विलास फुलचंद पांचाळ, सादिक खान आदी मान्यवर उपस्थित होते..

# लातूर शहर महानगरपालिका आपत्कालीन कक्ष २४ तास कार्यरत





लातूर/प्रतिनिधी : दि.२५/०७/२०२५ लातूर पासून शहरात सतत पाऊस पडत असल्याने लातूर शहर महानगरपालिका आपत्कालीन कक्षातील कर्मचारी २४ तास कार्यरत असून आज शहरात इस्लामपूरा, डि- मार्ट व रिंग रोड दादाजी कोंडदेव नगर लक्ष्मी ग्रँड हॉटेलच्या समोर नाला मोठ्या जेसीबी मार्फत काढून नाले वाहते करण्यात आले तसेच सतत पाऊस पडत आसल्याने शहरातील विविध भाग तेली गल्ली, हत्ते नगर, जूना कव्हा रोड, चलवाड नगर, तथागत चौक, मेघराज नगर, आंबेडकर चौक, अंबाजोगाई रोड, खोरे गल्ली, वडारवाडा नाना-नानी पार्क येथील तुंबलेल्या नाल्या साफ करुन नाली वाहते करण्यात आले तसेच प्रभाग क्र.०२ गाझीपुरा ग्रीन बेल्ट मधील रस्त्यावर पडलेले झाड तोडून रस्ता वाहतूकीस खुल्ला करण्यात आला आपत्कालीन कामासाठी आपत्कालीन कक्ष २४ तास कार्यरत आहे.

तरी आपत्कालीन स्थितीत नागरीकांनी आपत्कालीन कक्ष प्रमुख श्री.रवी कांबळे मोबाईल क्रमांक ९९७०९६४४५३ यांच्याकडे संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# कारगिल विजयी दिनानिमित्त सैनिकांचा सन्मान



बिलोली /प्रतिनिधी :- कारगिल विजयी दिनानिमित्त बिलोली येथील आंतरभारती शिक्षण संस्थेच्या पू ज्य साने गुरुजी प्राथमिक व आंतरभारती माध्यमिक विद्यालयाच्या वतीने सैनिकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जयमाला पटने या होत्या. या सन्मान सोहळ्यात शंकरराव तुळसाबाई रामराव बोंगाळे, सुरेश राहूबाई नागोराव जाधव, शंकरराव भागीरथबाई बसवंतराव मुंडकर, गंगाधर गंगुबाई नागोराव गायकवाड, संतोष अहिल्याबाई शंकरराव उत्तरवाड, पुंडलिक काशाबाई सखाराम क्षीरसागर, रामेश्वर इंदुताई वसंतराव सूर्यवंशी, चंदर गंगाबाई बसवंतराव अनंतवार यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित सैनिकांनी आपल्या सेवा काळातील आठवणी विद्यार्थ्यांपुढे प्रकट करत सैनिकांचे योगदान विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले. उपस्थित सैनिकांपैकी सर्वांनीच जम्मू कश्मीर, राजस्थान, पंजाब, आसाम, त्रिपुरा, पश्चिम बंगाल, अरुणाचल प्रदेश, ओरिसा, तामिळनाडू, नागालँड , मणिपूर आदी राज्यात सेवा बजावली. यापैकी पुंडलिक क्षीरसागर हे कारगिल युद्धात स्वतः सहभागी असल्याने त्या युद्धाच्या आठवणी विद्यार्थ्यांपुढे सांगितल्या.

सहशिक्षक दत्तात्रय साखरे यांनी प्रास्ताविक विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश सोनकांबळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक व्ही जी चंदनकर यांनी मानले.

# ३१ जुलै पर्यंत मालमत्ता करात ५ % सूट तसेच ऑनलाइन कर भरणा केल्यास अतिरिक्त ५ % सुट असे १०% सूट फक्त ३१ जुलै पर्यंत

## ऋमहिला व दिव्यांग यांच्या नावे असलेल्या मालमत्तास अतिरिक्त ५ % सुट

लातूर/प्रतिनिधी :- कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिका मार्फत गत वर्षापासून नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी विविध सुट/सवलती देण्यात येत आहेत. त्यानुसार ३१ जुलै पर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यास ५ % सवलत व पश्र्ळपश भरणा-यास अतिरिक्त ५ % अशी सूट देण्यात आली आहे . सदरील योजनेस मालमत्ताधारकांचा मिळणारा उस्फुर्त प्रतिसाद , कर भरणा केंद्रावर होणारी गर्दी विचारात घेता मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांनी मालमत्ता धारकाना विहित कालावधीत टॅक्स भरणा करून शेवटच्या दिवसात होणारी गर्दी टाळावी असे आव्हान केले आहे. टॅक्स सूट कालावधीत नागरिकनाचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत ११ हजार हून अधिक मालमत्ताधरकांनी सूट चा लाभ घेऊन कर भरणा केलेला आहे तरी दिलेली सूट योजना ३१ जुलै पर्यंतच असल्याने उर्वरित मालमत्ता धारकाणी त्वरित टॅक्स भरून सूट चा लाभ घ्यावा व सहकार्य करावे असे आवाहन कर संकलन व कर आकारणी विभाग, मनपा लातूर यांच्या वतीने करण्यात येते. कर भरणा करण्यासाठी mclatur.org, LaturProperty Tax सिटीझन ॲप किंवा propertytax.mclatur.in या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.

# जाधव,शिंदे,गवळी परिवाराचे माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या कडून सांत्वन




लातूर :-- लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी रेणापूर तालुक्यातील दर्जीबोरगाव येथील कै.गंगाराम गवळी यांचे निधन झाले या अनुषंगाने त्यांच्या निवासस्थानी जावून गवळी कुटुंबियांचे सांत्वन केले. तसेच लातूर तालुक्यातील चिकलठाणा येथील कै.प्रभावती जाधव यांचे निधन झाले त्यांच्या निवासस्थानी जावून जाधव कुटुंबियांचे सांत्वन केले, यासोबतच महमदापुर येथील कै.दत्तराव शिंदे यांचे निधन झाले त्यांच्या निवासस्थानी जावून शिंदे कुटुंबियांचे सांत्वन केले. तसेच चिकलठाणा येथील गोपाळ पाटील व नंदकुमार देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांनी भेट दिली. यावेळी रेणाचे चेअरमन अनंतराव ठाकूर-देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव,२१ शुगरचे उपाध्यक्ष विजय देशमुख,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख,रेणाचे व्हा चेअरमन प्रविण पाटील,संचालक रणजित पाटील,रेणापूर बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती शेषेराव हाके पाटील, जिल्हा बँकेचे संचालक राजकुमार पाटील, अनुप शेळके,जिल्हा कॉँग्रेसचे समन्वयक सचिन दाताळ ,बाबासाहेब देशमुख,प्रकाश सुर्यवंशी,सचिन माटेगावकर, नरसिंग इंगळे, प्रताप शिंदे, बळवंत पाटील, विश्वनाथ कागले, दिनेश साळुंखे, चंद्रशेखर उरगुंडे, गोपाळ पाटील, उमेश इंगळे, नंदकुमार देशमुख, महेश देशमुख, अमृतराव जाधव, महेंद्र जाधव, विकास इंगळे शाहूराज उरगुंडे, राजाभाऊ जाधव, राहुल देशमुख,अमित पवार,इस्माईल शेख,अजम शेख आदींची उपस्थिती होती.

# पत्रकार विठ्ठल राऊत यांना मातृशोक शेकडोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार



लातूर :- लातूर येथील साप्ताहिक अतुल्य चे संपादक तथा असोसिएशन ऑफ स्मॉल न्युज पेपर इंडियाचे विभागीय अध्यक्ष विठ्ठल राऊत यांच्या मातोश्री इंदिराबाई भानुदास राऊत यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी शनिवार, दि. २६ जुलै २०२५ रोजी पहाटे निधन दुःखद झाले. बोधे नगर येथील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मागील काही महिन्यांपासून त्या वृद्धापकाळाने आजारी होत्या. मातोश्री इंदिराबाई भानुदास राऊत यांच्या पार्थिवावर लातूर येथील खाडगाव स्मशानभूमीत शेकडोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांचे आप्तस्वकीय,मित्रपरिवार,पत्रकार बांधव,राजकीय,शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मातोश्री इंदिराबाई भानुदास राऊत यांच्या पश्चात विठ्ठलराव राऊत यांच्या सारखा कर्तबगार मुलगा, मुलेमुली, सुना,नातू पनतू असा मोठा परिवार आहे. एक नातू अमेरिकेत मोठ्या पदावर कार्यरत आहे. मातोश्री इंदिराबाई राऊत यांच्या निधनाबद्दल अनेकांना शोक व्यक्त केला आहे.


# अण्णा भाऊ साठे साहित्याच्या तीन खंडाचे ऑगस्टमध्ये प्रकाशन



लातूर /प्रतिनिधी :- साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे तीन खंड अण्णा भाऊं साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून ऑगस्टमध्ये प्रकाशित करण्यात येणार आहेत अशी माहिती अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव प्राचार्य डॉ.संजय शिंदे यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीच्या वतीने कादंबरीचे तीन खंड (सहा भाग) व कथांचा एक खंड (दोन भाग) असे आठ खंड २०२३ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल, मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री,तथा समितीचे अध्यक्ष,विधानसभेचे सभापती, उपसभापती आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आले, त्या नंतर समितीने अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे तीन खंड १) अण्णाभाऊ साठे:समग्र वाड्.मय कथासंग्रह -खंड क्रमांक पाच, २)अण्णाभाऊ साठे: समग्र वाड्.मय लोकनाट्य व नाटक -खंड क्रमांक सहा, ३)अण्णाभाऊ साठे- समग्र वाड्.मय- शाहिरी व प्रवास वर्णन -खंड क्रमांक सात हे खंड प्रकाशित करण्यासाठी महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री,मा. उपमुख्यमंत्री,(दोन्ही)मा ना.चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा समितीचे अध्यक्ष व मा.ना.इंद्रनील नाईक, राज्य मंत्री तथा समितीचे उपाध्यक्ष यांची तारीख व वेळ मिळण्यासाठी पत्रव्यवहार केला आहे.अण्णा भाऊ साठे यांची जयंती ऑगस्टमध्ये देशात आणि महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते त्यामुळे सदरील खंडाचे वरील मान्यवरांच्या हस्ते ऑगस्टमध्ये प्रकाशन करण्यात येणार आहे.या वरील सर्व साहित्याचे ऑडिओ आणि ईबुक्स सुध्दा तयार केले आहे त्याचेही लोकार्पण करण्यात येणार आहे.तसेच पुढील काळात अण्णाभाऊ साठे यांचे अप्रकाशित साहित्य, चित्रमय चरित्र, समीक्षा ग्रंथ,तीस कादंब-यांचा इंग्रजी,आठ कादंब-यांचा हिंदी अनुवाद आणि चित्रपट निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती समितीचे सदस्य सचिव डॉ.संजय शिंदे यांनी दिली आहे.

# भाटुंबा येथे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे जंगी स्वागत



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील भाटुंबा येथे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे गावातुन ढोलांच्या गजरात मिरवणूक काढत ठिकठिकाणी फटाक्यांची आतिशबाजी करत महिलांनी त्यांचे औक्षण करून खासदार सोनवणे यांचे ज्ञानेश्वर तात्या चवरे यांच्यासह ग्रामस्थांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. याबाबतची सविस्तर वृत्त असे की केज पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर तात्या चवरे यांनी स्नेह भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमा निमित्त बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे हे भाटुंबा येथे आले आसता ज्ञानेश्वर तात्या चवरे यांनी लाडक्या खासदारांची गावातुन ढोल ताशा, फटाक्यांची आतिषबाजी, ठिकाणी ठिकाणी गावातील महिलांनी औक्षण केले आशी आगळावेगळी मिरवणूक काढली भाटुंबा येथील चहात्यांनी काढली, यावेळी बजरंग बप्पा बोलाताना आसे म्हणाले सर्वांना सोबत घेत काम करणार कोणाला काही आडचणी असतील तर मला सांगा मी सर्वांच्या अडचणी सोडविण्यासाठी तत्पर आहे ,या भव्य दिव्य स्वागतान मी भाराऊन गेलो मी ज्ञानेश्वर तात्या चवरे यांचा रुणी आहे या कार्यक्रमासाठी केज तालुक्यातील नव्हे तर अंबाजोगाई,आष्टी तालुक्यातील बजरंग बप्पा सोनवणे,व ज्ञानेश्वर तात्या चवरे यांचे चहाते आले होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार माजी सभापती ज्ञानेश्वर तात्या चवरे यांनी केले होते.

# शासनाने भाकड जनावरांचे वजन करून वजनाप्रमाणे पैसे द्यावेत-शेतकऱ्यांची मागणी कुरेशी बांधवांच्या संपाचा शेतकऱ्यांना फटका शेतकरी चिंतेत



केज/प्रतिनिधी शासनाने भाकड जनावरांचे वजन करून वजनाप्रमाणे पैसे शेतकऱ्यांना द्यावेत अशीमागणी शेतकऱ्यांतून केली जात आहे. तर कुरेशी बांधवांच्या संपाचा शेतकऱ्यांना फटका बसला असून शेतकरी सध्या चिंतेत आहेत,शेतकरी अडचणीत सापडले असून शासनाने तात्काळ दखल घ्यावी अन्यथा उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा व्यापारी व शेतकरी बांधवांनी साळेगाव येथील आठवडी जनावराच्या बाजारात माध्यमांशी बोलताना प्रशासनाला दिला आहे. याबाबत माहितची सविस्तर माहिती अशी की, गो हत्येच्या नावाखाली काही बजरंग दलाचे कार्यकर्ते व गोरक्ष गोशाळेच्या नावाखाली व्यापाऱ्यांना नाहक त्रास देऊन व त्यांचा छळ करून पैसे वसूल करत आहेत. संबंधिताविरोधक तक्रार देण्यासाठी व्यापारी व शेतकरी पोलीस यांच्याकडे जातात परंतु पोलीस शेतकऱ्याची व व्यापाऱ्यांची तक्रार दाखल करून घेत नाहीत पोलिसाचे व बजरंग दल आणि गोरक्षकांचे लागेबांधे आहेत असा आरोप व्यापारी व शेतकऱ्यांनी केला आहे. सध्या संबंध राज्यावर कुरेशी समाज बांधवांच्या वतीने जनावरे खरेदी विक्री सह इतर व्यवसाय बंद करून संप पुकारला आहे. या संपाचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे सध्या शेतकरी अडचणीत सापडला असून गुरुवारी केज तालुक्यातील साळेगाव येथील आठवडी जनावरांचा बाजार ठप्प झाला आहे. दुपारी २-०० वाजेपर्यंत फक्त तीन व्यवहार झाले होते जनावराचे खरेदी विक्री नंतर जनावराचे दाखले केले जातात त्यावरून सदर नोंद झाल्याची माहिती मिळाली.

माध्यमांशी बोलताना शेतकरी बांधव म्हणाले की, आमची वय वृद्ध जनावरे, लंगडी मोडलेले व अपंग जनावरे आणि भाकड जनावरे सध्या आमच्याकडे चारा शिल्लक नसल्यामुळे आम्ही जनावरे सांभाळू शकत नाहीत. जर व्यापाऱ्यांनी आमची जनावरे खरेदी केली नाही तर आम्ही जनावरे कुठे घेऊन जायची सध्या आम्हाला शेतात खत, औषधे, खुरपणी करण्यासाठी पैसे नाहीत आमच्याकडील भाकड जनावरे व्यापाऱ्यांना विकून आम्ही आमच्या अडचणी भागवत होतोत. परंतु व्यापाऱ्याने बंद पुकारल्यामुळे आज आमचे व्यवहार बंद झाले आहेत शासनाने तात्काळ कायदा शितील करून पूर्वीप्रमाणे जनावरांच्या खरेदी विक्रीचे व्यवहार चालू करावेत अन्यथा शासनांनी आमच्या जनावरांची वजनाप्रमाणे खरेदी करून आम्हाला पैसे देऊन आमची जनावरे गो शाळेत द्यावी. आज आम्ही साळेगाव येथील बाजारात जनावरे विक्रीसाठी घेऊन आलो परंतु व्यापाऱ्यांनी बंद पुकारल्यामुळे आमचा आज रोजी चा जाणे येण्याचा खर्च देखील निघत नाही. व्यापाऱ्यांच्या संपामुळे शेतकरी संकटात सापडला असून शेतकऱ्यावर उपासमारीची वेळ आली आहे अशा प्रतिक्रिया शेतकरी बांधवांनी दिल्या आहेत. गावरान गाई ही गोमाता आहे आम्ही गावरान गाईची खरेदी विक्री करत नाहीत व गावरान गाईची कत्तल करत नाहीत परंतु जरशा गाईंचे आम्ही खरेदी विक्री करत आहोत गोरक्षणाच्या नावाखाली नाहक आमची बदनामी करून स्वतःच्या फायद्यासाठी आम्ही खरेदी केलेले जनावरे आढळून आमच्याकडून पैसे वसूल करत आहेत. आम्ही बाजारात शेतकऱ्याकडून बैल, म्हशी, दूध देणाऱ्या जरश्या गाईंची खरेदी विक्री करत आहोत. बाजारातून जनावरे खरेदी विक्री करून आमच्या गावाकडे जात असताना वाटेत बजरंग दलाचे काही कार्यकर्ते व गोरक्षणाच्या नावाखाली काही लुटारू हे आमच्या जनावरांनी भरलेल्या गाड्या अडून आम्हाला दमदाटी करून आमच्याकडून पैसे वसूल करतात जर आम्ही नाही पैसे दिले तर आम्हाला धमक्या देतात. त्यामुळे आमचे आर्थिक नुकसान होत आहे त्यामुळे आमचा व्यापार बंद पडला असून आमच्यावर व आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. वरील लोकांच्या त्रासामुळे आम्ही जनावरांची खरेदी विक्री सह इतर सर्व व्यवहार बंद केले आहेत जोपर्यंत शासन आमची दखल घेत नाहीत तोपर्यंत आम्ही संप चालू ठेवणार आहोत अशा प्रतिक्रिया व्यापारी बांधवांनी दिले आहेत. जर प्रशासनाने आमच्या मागणीची दखल न घेतल्यास यापुढे उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा देण्यात आला आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE